आजचे पंचांग

गुरुवार, दि. २८ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, द्वादशी सकाळी ७-५७ पर्यंत नंतर त्रयोदशी तिथी, दिवस नक्षत्र - चित्रा सकाळी ८-०९ पर्यंत नंतर स्वाती, चंद्र रास - तुला, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


**इबोला भारताच्या वेशीवर**

**नवी दिल्ली :** युगांडाच्या २८ वर्षांची महिला केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहचली होती. या महिलेला इबोलासदृश्य लक्षणे आढळून आल्यानंतर इंदिरानगर रुग्णालयात विलगीकरणात ठेवण्यात आले आहे. तिला खबरदारी म्हणून रुग्णालयात दाखल केल्यानंतर तिचे सॅम्पल्स घेऊन इबोला टेस्टिंगसाठी पाठवण्यात आले आहेत. तिचे सॅम्पल पुण्याच्या राष्ट्रीय व्हायरॉलॉजी इन्स्टिट्यूटमध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. २८ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २४२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### मुंबई महापालिकेचे चार प्रस्ताव स्थगित

**मुंबई :** देशातील सर्वात मोठी महापालिका असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका मध्ये भाजपच्या नेतृत्वाखाली सत्ता स्थापन झाल्यानंतर प्रशासनाचे निर्णय वेगाने घेतले जात असतानाच, आता ठाकरे गटाच्या आक्रमक भूमिकेमुळे महापालिकेचे चार महत्त्वाचे प्रस्ताव स्थगित करण्यात आले आहेत. आमदार आदित्य ठाकरे यांच्या विरोधानंतर हे प्रस्ताव फेरविचारासाठी प्रशासनाकडे परत पाठवण्यात आले.

### पुढचे तीन दिवस पावसाचा इशारा

**पुणे :** उत्तर भारतात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या तीव्र उष्णतेनंतर आता हवामानात मोठा बदल होण्याची शक्यता असून, पुढील तीन दिवस देशातील अनेक भागांत मेघगर्जनेसह पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. दिल्ली, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि राजस्थानसह अनेक राज्यांमध्ये २८ मेपासून वादळी पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे तापमानात घट होऊन नागरिकांना उष्णतेपासून दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

### सिंचन योजनांसाठी अधिक निधीची शक्यता

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील साखर उद्योग, कांदा उत्पादकांचे प्रश्न आणि जलजीवन मिशनच्या कामांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्ली दौऱ्यावर असून, बुधवारी जलसंपदा विभागात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर बोलताना फडणवीस यांनी महाराष्ट्रातील नदीजोड प्रकल्पांबाबत केंद्र सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले.

## शालेय साहित्याच्या किमतींमध्ये २५ टक्क्यांपर्यंत वाढ

# शाळा सुरू होण्यापूर्वीच महागाईचा धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या तोंडावर पालकांना महागाईचा मोठा फटका बसत असून, यंदा शालेय साहित्याच्या किमतींमध्ये तब्बल २० ते २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थिती, वाढते इंधन दर, कागद निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती आणि वाहतूक खर्चात झालेली वाढ यामुळे वह्या, पुस्तके, गणवेश आणि पूरक शैक्षणिक साहित्य महागले आहे. त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडू लागले आहे.

जून महिन्यापासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असल्याने पुण्यातील प्रमुख बाजारपेठांमध्ये शालेय साहित्य खरेदीसाठी पालकांची गर्दी वाढली आहे. मात्र, दरवाढीमुळे पालकांच्या चिंतेत भर पडली आहे. मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक साहित्य घेणे अपरिहार्य असल्याने वाढीव खर्चाचा भार त्यांना सहन करावा लागत आहे.

गेल्या काही महिन्यांत कागद निर्मितीसाठी लागणारा पल्प आणि अन्य कच्च्या मालाच्या किमती आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्याचबरोबर डिझेल-पेट्रोल दरवाढीमुळे मालवाहतुकीचा खर्चही दुपटीहून अधिक वाढला आहे. परिणामी, यंदा वह्यांच्या किमतींमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत १० ते १५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. पाठ्यपुस्तकांसोबतच गाईड, वर्कबुक आणि इतर पूरक साहित्यांच्या किमतींमध्येही २० टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

शालेय गणवेशासाठी लागणाऱ्या कापडाच्या किमती वाढल्या असून, शिवणकाम करणाऱ्या कारागिरांच्या मजुरीतही वाढ झाली आहे. त्यामुळे यंदा गणवेशाचे दर १० ते २० टक्क्यांनी वाढले आहेत. याचा थेट परिणाम मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांच्या बजेटवर होत आहे.

आधीच इंधन दरवाढ, वाढती महागाई आणि दैनंदिन खर्चामुळे त्रस्त असलेल्या पालकांसाठी आता मुलांच्या शिक्षणाचा खर्चही मोठे आव्हान बनला आहे. शालेय साहित्याच्या वाढत्या किमतींकडे सरकारने तातडीने लक्ष देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.

युद्धजन्य परिस्थिती आणि जागतिक बाजारातील अस्थिरतेचा परिणाम आता थेट सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर दिसू लागला असून, शिक्षण क्षेत्रही त्यातून सुटलेले नाही, अशी भावना पालक व्यक्त करत आहेत.

## पुण्यात सीएनजी दरवाढीचा पुन्हा झटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** इराण-अमेरिका संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत असून त्याचा परिणाम आता देशांतर्गत इंधन दरांवरही दिसून येत आहे. पेट्रोल-डिझेल दरवाढीनंतर आता पुण्यात सीएनजीच्या दरातही पुन्हा वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीमुळे वाहनचालकांसह सर्वसामान्य नागरिकांच्या खर्चात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एमएनजीएल कडून सीएनजीच्या किरकोळ विक्री दरात प्रति किलो २ रुपये ५० पैशांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे सीएनजीचा दर ९२ रुपये २५ पैशांवरून थेट ९४ रुपये ७५ पैसे प्रति किलोवर पोहोचला आहे. वाढीव दर २७ मेच्या मध्यरात्रीपासून लागू करण्यात आले आहेत. इनपुट गॅसच्या वाढलेल्या खर्चामुळे ही दरवाढ करावी लागल्याचे एमएनजीएलकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या दरवाढीचा सर्वाधिक फटका रिक्षा, टॅक्सी आणि सीएनजीवर चालणाऱ्या खासगी वाहनधारकांना बसणार आहे.

सार्वजनिक वाहतूक आणि मालवाहतूक खर्च वाढल्याने भाजीपाला, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवरही परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या पुण्यात पेट्रोलचा दर प्रतिलिटर १११ रुपये ५२ पैसे इतका आहे, तर सीएनजीचा दर ९४ रुपये ७५ पैसे प्रति किलोवर पोहोचला आहे. त्यामुळे लवकरच सीएनजीचा दर शंभरी पार करणार का, अशी भीती ग्राहकांकडून व्यक्त केली जात आहे.

## आसाराम बापूची जन्मठेप कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जोधपूर :** अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणात स्वयंघोषित अध्यात्मिक गुरू आसाराम बापू याला सुनावण्यात आलेली जन्मठेपेची शिक्षा राजस्थान उच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. २०१८ मध्ये विशेष पोक्सो न्यायालयाने दिलेल्या शिक्षेविरोधात दाखल केलेले आसारामचे अपील उच्च न्यायालयाने फेटाळून लावले. मात्र, त्याला अंशतः दिलासा देत सामूहिक बलात्कार आणि गुन्हेगारी कट रचण्याच्या आरोपांतून न्यायालयाने मुक्त केले आहे.

सध्या वैद्यकीय कारणास्तव अंतरिम जामिनावर बाहेर असलेल्या आसारामला तातडीने आत्मसमर्पण करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. २०१३ मध्ये जोधपूर येथील आश्रमात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आसारामवर करण्यात आला होता. त्यानंतर झालेल्या तपासात पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले होते. एप्रिल २०१८ मध्ये विशेष पोक्सो न्यायालयाने आसारामला दोषी ठरवत नैसर्गिक मृत्यूपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या निर्णयाविरोधात आसारामने राजस्थान उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. न्यायमूर्ती अरुण कुमार मोंगा आणि न्यायमूर्ती योगेंद्र कुमार पुरोहित यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

खंडपीठाने स्पष्ट केले की, भारतीय दंड संहितेअंतर्गत बलात्काराचा आरोप, तसेच पोक्सो कायद्यांतर्गत लैंगिक छळ आणि बाल न्याय कायद्यांतर्गत असलेले गुन्हे सिद्ध झाले आहेत.

## आमदार रोहित पवारांचा सरकारवर घणाघात

# सीआयडी ही कुचकामी यंत्रणा बनली आहे

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राज्यातील तपास यंत्रणांवर अत्यंत कठोर शब्दांत टीका करत सीआयडी ही सध्या पूर्णपणे कुचकामी यंत्रणा बनली असून ती सरकारवरचे बिनकामाचे ओझे असल्याचा आरोप केला आहे. राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणाच्या तपासातील दिरंगाईवरून त्यांनी थेट राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला.

जानेवारी महिन्यात बारामती येथे झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. या घटनेला चार महिने उलटूनही तपासात कोणतीही ठोस प्रगती झालेली नसल्याचा आरोप करत रोहित पवार म्हणाले की, सीआयडी नेमका कोणता तपास करत आहे हेच समजत नाही. तपासाची गती आणि पद्धत पाहता या यंत्रणेच्या अस्तित्वावरच प्रश्न निर्माण होत आहेत.

रोहित पवार यांनी मुख्यमंत्री आणि गृहमंत्रीही देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालावे, अशी मागणी केली आहे. एका मोठ्या नेत्याचा अपघाती मृत्यू होतो आणि राज्याची प्रमुख तपास यंत्रणा निष्क्रिय राहते, हे अत्यंत गंभीर असल्याचे ते म्हणाले. सोशल मीडियावरूनही त्यांनी सरकारला लक्ष केले. राजकीय नेत्यांसाठी मैत्रीची व्याख्या सामान्य लोकांपेक्षा वेगळी असते का, असा सवाल उपस्थित करत त्यांनी तपासातील दिरंगाईवर संताप व्यक्त केला.

रोहित पवार यांनी म्हटले की, विधिमंडळ अधिवेशनात मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणातील दोषींना पाताळातूनही शोधून काढू, असे आश्वासन दिले होते. तसेच या प्रकरणाची सीबीआय चौकशी व्हावी यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल आणि कर्नाटकमध्ये दाखल झालेला 'झिरो एफआयआर' महाराष्ट्रात वर्ग केला जाईल, असेही सांगण्यात आले होते. मात्र अडीच महिने उलटूनही त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला.

तपास यंत्रणेच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत रोहित पवार यांनी गुरुवारी सकाळी १०.३० वाजता सीआयडी कार्यालयात जाणार असल्याची घोषणा केली आहे. तेथे जाऊन तपासाच्या प्रगतीबाबत अधिकाऱ्यांना जाब विचारणार असल्याचे त्यांनी सांगितले. आतापर्यंत आम्ही लोकशाही आणि सनदशीर मार्गाने भूमिका मांडत होतो. मात्र सीआयडीकडे ही भाषा समजत नसेल, तर आम्हाला वेगळ्या भाषेत संवाद साधावा लागेल, असा गंभीर इशाराही त्यांनी दिला आहे.

## कर्नाटकात राजकीय घडामोडींना आला वेग

# मुख्यमंत्री सिद्धरामय्या उद्या राजीनामा देणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू :** कर्नाटकच्या राजकारणात मोठ्या घडामोडींना वेग आला असून मुख्यमंत्री सिद्धरामय्या उद्या २८ मे रोजी राजीनामा देऊ शकतात, अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. वृत्तसंस्था पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, सिद्धरामय्या यांनी राज्यपाल थावरचंद गेहलोत यांची भेट घेण्यासाठी वेळ मागितला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या शक्यता अधिक बळकट झाल्या आहेत.

काँग्रेसचे वरिष्ठ आमदार आर. व्ही. देशपांडे यांनीही या चर्चांना दुजोरा दिला आहे. त्यांनी म्हटले की, मुख्यमंत्र्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय आधीच घेतला आहे. ते उद्या राजीनामा देऊ शकतात. त्यांनी हायकमांडला शब्द दिला असल्याचे मला सांगितले. पुढील मुख्यमंत्री कोण असेल, याचा निर्णय काँग्रेस हायकमांड घेईल.

काँग्रेसचे प्रभारी रणदीप सिंह सुरजेवाला बेंगळुरूमध्ये दाखल झाले असून त्यामुळे राजकीय हालचालींना आणखी वेग आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, उद्या काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत डी. के. शिवकुमार यांची नेतेपदी निवड होण्याची शक्यता आहे. त्यानंतर काँग्रेसकडून सरकार स्थापनेचा दावा करण्यात येऊ शकतो. राजीनाम्यापूर्वी सिद्धरामय्या मंत्रिमंडळासोबत बैठक घेणार असल्याची माहितीही समोर आली आहे. त्यानंतर ते राज्यपालांकडे राजीनामा सादर करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रणदीप सुरजेवाला यांनी आज पत्रकारांशी बोलताना काँग्रेस विधिमंडळ पक्षाची कोणतीही बैठक अद्याप बोलावण्यात आलेली नाही आणि कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही, असे स्पष्ट केले.

सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांनी २६ मे रोजी दिल्लीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि खासदार राहुल गांधी यांची तब्बल सहा तास भेट घेतली होती. सिद्धरामय्या यांनी राजीनामा देण्यास नकार दिला होता. त्यांना पदावरून हटवण्यात आले तर पक्षात फूट पडू शकते आणि ५० ते ६० आमदार त्यांच्यासोबत जाऊ शकतात, अशी भूमिका त्यांनी पक्ष नेतृत्वासमोर मांडल्याचे सांगितले जात आहे. तसेच ते शिवकुमार यांच्या नेतृत्वाखाली काम करणार नसल्याचेही स्पष्ट केल्याची चर्चा आहे. (संबंधित वृत्त पान ४ वर)

### महाविकास आघाडी सर्व जागा लढवणार

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधानपरिषदेवर निवडून द्यायच्या १७ जागांसाठी महाविकास आघाडीने एकत्रितपणे मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. १८ जून रोजी होणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीसाठी काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि शरदचंद्र पवार पक्षाने १७ जागा लढवण्याचा निर्धार केला आहे. दोन दिवसांत जागावाटपाची घोषणा होणार आहे. आघाडीची बैठक मुंबई पार पडली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, शिवसेना नेते अनिल परब, अंबादास दानवे आणि मिलिंद नार्वेकर बैठकीला उपस्थित होते.

## जागावाटपाचा तिढा अंतिम टप्प्यात

### नाशिक, संभाजीनगर आणि पुण्यावर महायुतीत चर्चा कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधून होणाऱ्या विधानपरिषद निवडणुकांच्या १७ जागांसाठी महायुतीमधील जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला असून आता केवळ २ ते ३ जागांवर अंतिम निर्णय बाकी असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. हा तिढा दिल्लीत नव्हे तर मुंबईतच महायुतीतील प्रमुख नेते एकत्र बसून सोडवतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत साखर उद्योगासंदर्भातील बैठकीनंतर फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विधानपरिषद निवडणुकीतील जागावाटपावर भाष्य केले. फडणवीस म्हणाले की, विधानपरिषद निवडणुकीबाबत आमचे जवळपास एकमत झाले आहे. फक्त नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरच्या जागांबाबत आम्ही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे आग्रह धरत आहोत. पुण्याच्या जागेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून मागणी करण्यात आली आहे. या सर्व चर्चा सकारात्मक वातावरणात सुरू असून तिढा लवकरच सुटेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महायुतीसमोरील कठीण पेपर आता संपला असून केवळ सोपा पेपर सोडवून त्यावर टिकमार्क करायचे बाकी आहे, असे म्हणत फडणवीस यांनी जागावाटप अंतिम टप्प्यात असल्याचे संकेत दिले. संभाव्य जागावाटपात १७ पैकी तब्बल १२ जागांवर भाजप निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. तर शिवसेनेला ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागा मिळू शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## निवडणुकीच्या तोंडावर नव्या वादाला तोंड

# गोकुळ संघाच्या दुधाला हलालचे प्रमाणपत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**कोल्हापूर :** पश्चिम महाराष्ट्रातील सहकार आणि राजकारणाचे प्रमुख केंद्र मानल्या जाणाऱ्या कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात 'गोकुळ' आता नव्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. गोकुळच्या विविध दुग्धजन्य उत्पादनांसाठी घेण्यात आलेल्या हलाल प्रमाणपत्राचा मुद्दा ऐन निवडणुकीच्या तोंडावर समोर आल्याने या वादाला धार्मिक रंग चढला असून, गोकुळच्या दुधाला खरंच हलाल प्रमाणपत्राची आवश्यकता आहे का, असा सवाल काही संघटनांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

कोल्हापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोकुळ दूध संघाकडे दररोज सुमारे १७ लाख लिटर दूध संकलन होते. कोट्यवधी रुपयांची उलाढाल आणि ग्रामीण भागातील मोठे आर्थिक जाळे यामुळे गोकुळ हे केवळ दूध संघ नसून जिल्ह्यातील प्रभावी सत्ता केंद्र मानले जाते. त्यामुळे या संघावर वर्चस्व मिळवण्यासाठी सर्वच प्रमुख राजकीय गटांमध्ये कायमच चुरस असते. यापूर्वी गोकुळवर टँकर व्यवहार, कमिशन, भ्रष्टाचार अशा आरोपांवरून राजकीय संघर्ष होत असताना आता पहिल्यांदाच धार्मिक स्वरूपाचा मुद्दा पुढे आला आहे. गोकुळने आपल्या तूप, लोणी आणि दूध पावडर यांसारख्या उत्पादनांच्या विक्रीसाठी हलाल प्रमाणपत्र घेतल्याची माहिती समोर आली आहे. मार्च २०२३ मध्ये काढण्यात आलेले प्रमाणपत्र सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर हा वाद पेटला. या प्रमाणपत्राच्या आधारे काही संघटनांनी गोकुळला हलाल प्रमाणपत्राची गरज काय, असा प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच हे प्रमाणपत्र विद्यमान सत्ताधाऱ्यांच्या काळात घेण्यात आल्याचा दावा देखील करण्यात येत आहे.

या वादावर स्पष्टीकरण देताना मंत्री हसन मुश्रीफ यांनी हा मुद्दा दिशाभूल करणारा असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या मते, गोकुळने हे प्रमाणपत्र प्रत्यक्षात २०१८ पासून घेतले असून त्यामागे आखाती देशांमध्ये उत्पादन निर्यातीची गरज होती. आखाती देशांमध्ये दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीसाठी हलाल प्रमाणपत्र आवश्यक असते. त्यामुळे तत्कालीन संचालक मंडळाने ते घेतले होते. दर दोन वर्षांनी या प्रमाणपत्राचे नूतनीकरण केले जाते, अशी माहितीही त्यांनी दिली. हसन मुश्रीफ यांनी आरोप केला की, गोकुळची निवडणूक पुढे ढकलण्याचा प्रयत्न अपयश आल्यानंतर काही जण आता तथ्यहीन मुद्दे उपस्थित करत आहेत. दरम्यान, गोकुळ दूध संघाच्या विद्यमान संचालक मंडळाची मुदत महिनाभरापूर्वी संपली आहे.

## केरळमध्ये ईडीविरोधात संताप; अधिकाऱ्यांच्या वाहनावर हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुवनंतपुरम :** केरळमध्ये अंमलबजावणी संचालनालयाच्या कारवाईविरोधात संतप्त कार्यकर्त्यांनी आंदोलन करत ईडी अधिकाऱ्यांच्या वाहनावर हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. वाहनावर विटा फेकण्यात आल्या तसेच पंतप्रधान मोदी यांच्या विरोधात घोषणाबाजीही करण्यात आली. विजयन यांच्या निवासस्थानी छाप्यांनंतर वाद अधिक चिघळल्याचे सांगितले जाते.

मिळालेल्या माहितीनुसार, तिरुवनंतपुरममध्ये माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन सुरू असताना काही कार्यकर्त्यांनी ईडी अधिकाऱ्यांच्या वाहनाला लक्ष्य केले. या घटनेनंतर पोलिसांनी कारवाई करत सीपीआय(एम) शी संबंधित कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे.

ईडीने पिनराई विजयन यांच्या तिरुवनंतपुरममधील निवासस्थानासह कन्नूर जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावीही छापेमारी केल्याचे वृत्त आहे. या कारवाईनंतर केरळसह दिल्लीतही डाव्या पक्षांच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन सुरू केले. सीपीआय(एम)ने या छाप्यांना राजकीय सूडबुद्धीची कारवाई असल्याचा आरोप केला आहे.

दरम्यान, आंदोलनकर्त्यांकडून केंद्र सरकार आणि ईडीविरोधात घोषणाबाजी करण्यात आल्याचे दिसत आहे. काही ठिकाणी पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. (संबंधित वृत्त पान ४)

## संपादकीय

### आता प्रतीक्षा मान्सूनची



**भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार केरळ आणि लक्षद्वीपमध्ये मान्सूनचे आगमन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. कडक उन्हाळ्याच्या तीव्र चटक्यांनंतर, देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था, कृषी क्षेत्र आणि सामान्य जनजीवन या मान्सूनच्या पहिल्या पावसाच्या आगमनाची अत्यंत आतुरतेने वाट पाहत आहे. लवकरच तो देशभरात येईल.**

भारतीय उपखंडासाठी मान्सून हा पाऊस नसून ती देशाची जीवनवाहिनी आहे. दरवर्षी मे महिन्याच्या शेवटी किंवा जूनच्या सुरुवातीला केरळच्या किनारपट्टीवर मान्सूनचे आगमन होते. हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, केरळ आणि लक्षद्वीपच्या काही भागांमध्ये येत्या चोवीस ते अठ्ठ्याऐंशी तासांत पाऊस पडण्याची शक्यता असून, नैऋत्य मान्सूनच्या पुढील प्रवासासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. याच काळात कर्नाटक आणि तमिळनाडूच्या काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. केरळमधील मान्सूनचे हे आगमन संपूर्ण देशासाठी एका नव्या ऋतूचक्राची आणि आर्थिक आशेची सुरुवात मानले जाते. उत्तर आणि मध्य भारतात उन्हाचा पारा पन्नास अंशांच्या आसपास पोहोचला असताना, संपूर्ण देश या मान्सूनच्या आगमनाची आस लावून बसला आहे. देशातील मान्सूनच्या या तीव्र प्रतीक्षेचे मुख्य कारण आपल्या अर्थव्यवस्थेच्या रचनेत दडलेले आहे. भारत हा आजही मोठ्या प्रमाणावर शेतीप्रधान देश असून, देशातील निम्म्याहून अधिक शेती ही थेट पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. खरीप हंगामातील प्रमुख पिके, जसे की भात, कापूस, सोयाबीन आणि ऊस, यांचे भवितव्य मान्सूनच्या वेळेवर येण्यावर आणि त्याच्या वितरणावर ठरते. जर मान्सून वेळेवर आणि पुरेसा झाला, तर ग्रामीण भागात शेतीचे उत्पादन वाढते. ग्रामीण भागातील उत्पन्न वाढले की बाजारात विविध वस्तूंची मागणी वाढते, ज्याचा थेट फायदा देशाच्या औद्योगिक आणि सेवा क्षेत्राला होतो. थोडक्यात सांगायचे तर, भारताच्या आर्थिक विकासाचा दर हा बऱ्याच अंशी मान्सूनच्या गतीवर निश्चित होत असतो. याशिवाय, देशातील जलसुरक्षेच्या दृष्टीनेही हा पाऊस अत्यंत महत्त्वाचा आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे देशातील मुख्य धरणांमधील आणि जलसाठ्यांमधील पाणी पातळी नीचांकी पातळीवर पोहोचली आहे. अनेक शहरांमध्ये आणि ग्रामीण भागात पिण्याचे पाणी मिळणे कठीण झाले आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी खालावल्यामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. मान्सूनचा हा पाऊस धरणांमधील पाणीसाठा वाढवण्यास आणि भूगर्भातील जलस्रोत पुनरुज्जीवित करण्यास मदत करतो. त्यामुळे शेतीसाठीच नाही, तर देशातील कोट्यवधी जनतेची तहान भागवण्यासाठी या पावसाची गरज आहे. हवामान बदलाच्या या काळात मान्सूनचे बदलते स्वरूप हे धोरणकर्त्यांसमोर मोठे आव्हान ठरत आहे. गेल्या काही वर्षांत पावसाचे दिवस कमी झाले असून, कमी वेळेत अतिवृष्टी होण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा वेळी केरळमध्ये मान्सूनचे वेळेवर आगमन होणे हा एक सकारात्मक संदेश असला, तरी त्याचा पुढील प्रवास कसा राहतो, यावर सर्वांचे लक्ष असते. हवामान विभागाने कर्नाटक आणि आसपासच्या परिसरात वादळी वाऱ्याचा जो इशारा दिला आहे, तो मान्सूनच्या सुरुवातीच्या काळातील वातावरणीय बदलांचा भाग आहे. हा पाऊस जितका वेगाने पुढे सरकेल, तितका तो देशाच्या अंतर्गत भागाला दिलासा देणारा ठरेल. महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी देखील मान्सूनची भूमिका महत्त्वाची असते. अन्नधान्याचे उत्पादन घटल्यास बाजारात डाळी, भाज्या आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती भडकतात. यामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडते आणि रिझर्व्ह बँकेलाही व्याजदरांबाबत कठोर निर्णय घ्यावे लागतात. चांगला पाऊस झाल्यास अन्नधान्याचा पुरवठा सुरळीत राहतो आणि महागाई आटोक्यात राहते. त्यामुळे उद्योगजगतापासून ते अगदी सामान्य गृहिणीपर्यंत प्रत्येक जण मान्सूनच्या पहिल्या थेंबाची वाट पाहत असतो. पुढील काळात भारताला आयातीच्या आघाड्यांवर निश्चितच मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागणार आहे. हवामान बदलाचा वाढता धोका लक्षात घेता, शेती क्षेत्राला तंत्रज्ञानाची जोड देणे आणि जलसंधारणाचे शाश्वत प्रकल्प राबवणे तातडीचे बनले आहे. ट्रम्प प्रशासनाचे जागतिक धोरण किंवा आंतरराष्ट्रीय बाजारातील आर्थिक अनिश्चितता या बाह्य घटकांचा देशांतर्गत व्यवस्थेवर होणारा परिणाम कमी करायचा असेल, तर अन्नधान्य उत्पादनात भारत स्वावलंबी राहणे गरजेचे आहे. या दृष्टीने मान्सूनच्या अनुकूलतेचा योग्य वापर करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणे, हाच देशाच्या दीर्घकालीन आर्थिक स्थिरतेचा खरा विजय ठरेल.

# लाभांशाने दिलेला दिलासा आणि वित्तीय आव्हाने




आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील घडामोडी आणि देशांतर्गत आर्थिक गणिते यांच्यात समतोल साधताना केंद्र सरकारला अनेक आघाड्यांवर कसरत करावी लागत आहे. अशातच, रिझर्व्ह बँकेने सरकारला दिलेल्या विक्रमी लाभांशामुळे वित्तीय तुटीचे लक्ष्य गाठणे सरकारसाठी काहीसे सोपे झाले आहे. हा लाभांश म्हणजे एका बाजूला सरकारी तिजोरीला मिळालेला मोठा बुस्टर डोस आहे, ज्यामुळे पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक वाढवणे आणि चालू खात्यातील खर्च भागवणे शक्य होईल. मात्र, अर्थशास्त्राच्या आणि विशेषतः वित्तीय धोरणांच्या परिभाषेत विचार केल्यास, हा अचानक मिळालेला फायदा जितका आनंददायी आहे, तितकाच तो भविष्यातील धोरणात्मक शिस्तीसाठी आव्हानात्मक ठरू शकतो.

हा लाभांश का वाढला, यामागील मूळ कारणांचा शोध घेतल्यास जागतिक बाजारातील घडामोडी समोर येतात. अमेरिकन फेडरल रिझर्व्हने वाढवलेले व्याजदर आणि आंतरराष्ट्रीय बाजारात डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य सावरण्यासाठी रिझर्व्ह बँकेने केलेल्या परकीय चलनाची खरेदी-विक्री, यामुळे केंद्रीय बँकेच्या उत्पन्नात मोठी भर पडली. याशिवाय, देशांतर्गत बँकिंग व्यवस्थेतील वाढलेली तरलता आणि सरकारी रोख्यांवरील मिळालेले उत्पन्न यामुळे हा विक्रमी लाभांश उभा राहिला आहे. परंतु, जागतिक अर्थकारणातील हे अनुकूल वारे नेहमीच असेच वाहतील, अशी शाश्वती कोणीही देऊ शकत नाही. जर आगामी काळात जागतिक मंदीचे सावट गहिरे झाले किंवा भू-राजकीय तणावामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराला धक्का बसला, तर रिझर्व्ह बँकेच्या या उत्पन्नाला मर्यादा येऊ शकतात. त्यामुळे या तात्पुरत्या नफ्याला कायमस्वरूपी महसुली उत्पन्नाचा स्रोत मानणे वित्तीय दृष्टीने चुकीचे ठरेल.

सरकारसमोर सध्या वित्तीय तूट मर्यादित ठेवण्याचे मोठे बंधन आहे. चालू आर्थिक वर्षात हे लक्ष्य साध्य करण्यासाठी या लाभांशाचा मोठा उपयोग होणार असला, तरी यामुळे सरकारचे सुखासीनतेचे क्षेत्र मर्यादित होते. जेव्हा सरकारला अशा प्रकारचे अनपेक्षित उत्पन्न मिळते, तेव्हा कर सुधारणा आणि महसूल वाढीचे मूलभूत प्रयत्न मंदावण्याची भीती असते. भारताची कर-ते-जीडीपी ही टक्केवारी अजूनही अनेक विकसनशील देशांच्या तुलनेत कमी आहे. प्रामाणिक करदात्यांवर अधिक बोजा न टाकता कराची व्याप्ती वाढवणे, कर चुकवेगिरीला आळा घालणे आणि जीएसटीसारख्या अप्रत्यक्ष करांमधील त्रुटी दूर करणे, हेच शाश्वत आर्थिक विकासाचे खरे मार्ग आहेत. या मूळ सुधारणांकडे दुर्लक्ष करून केवळ लाभांशाच्या बळावर वित्तीय शिस्त दाखवणे म्हणजे तात्पुरती मलमपट्टी करण्यासारखे आहे.

या अतिरिक्त निधीचा विनियोग कसा केला जातो, यावर देशाच्या आर्थिक विकासाचा वेग अवलंबून असणार आहे. हा पैसा लोकानुनयी योजना, जुन्या अनुदानांची बिले भागवणे किंवा महसुली खर्च पूर्ण करण्यासाठी वापरला गेला, तर त्याचे अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन सकारात्मक परिणाम होणार नाहीत. हा निधी जर रेल्वे, रस्ते, बंदरे आणि डिजिटल पायाभूत सुविधा यांसारख्या भांडवली खर्चासाठी वापरला गेला, तर त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल आणि खासगी गुंतवणुकीलाही चालना मिळेल. खासगी गुंतवणूक अजूनही अपेक्षेप्रमाणे वाढत

> **» रिझर्व्ह बँकेकडून मिळणारा विक्रमी लाभांश हा सरकारसाठी वित्तीय दिलासा ठरणार असला, तरी यामुळे दीर्घकालीन वित्तीय शिस्तीची आणि महसुली तूट कमी करण्याची आव्हाने पूर्णपणे संपत नाहीत, हे वास्तव विसरून चालणार नाही.**

नसल्याने, सार्वजनिक क्षेत्रातून होणारी ही गुंतवणूकच सध्या अर्थव्यवस्थेचे मुख्य इंजिन बनली आहे. त्यामुळे या पैशाचा प्रत्येक रुपया उत्पादक कामांसाठीच खर्च होईल, याची खबरदारी अर्थमंत्रालयाला घ्यावी लागेल.

रिझर्व्ह बँकेची स्वायत्तता आणि तिची आर्थिक ताकद टिकवून ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. बँकेकडे स्वतःचा आपत्कालीन निधी आणि राखीव साठा भक्कम असणे गरजेचे असते, जेणेकरून भविष्यात येणाऱ्या कोणत्याही आर्थिक संकटाचा किंवा बँकिंग क्षेत्रातील अस्थिरतेचा मुकाबला करता येईल. सरकारला मोठा लाभांश देताना केंद्रीय बँकेच्या स्वतःच्या आर्थिक क्षमतेवर कोणताही विपरित परिणाम होणार नाही, याची काळजी घेतली गेली पाहिजे. वित्तीय शिस्त ही केवळ कागदावरील आकडेवारी सुधारण्यापुरती मर्यादित नसून, ती देशाच्या आर्थिक रचनेला लवचिकता देणारी असायला हवी.

रिझर्व्ह बँकेचा लाभांश हा सरकारसाठी तात्कालिक दिलासा आहे, परंतु ते देशाच्या आर्थिक समस्यांवरील अंतिम उत्तर नाही. महसुली उत्पन्नातील शाश्वत वाढ, अनुदानांचे तर्कसंगत व्यवस्थापन आणि कठोर वित्तीय शिस्त यांचे पालन केल्याशिवाय भारताला मध्यम गतीच्या विकासाच्या सापळ्यातून बाहेर पडता येणार नाही. या अनपेक्षित निधीचा वापर आर्थिक सुधारणांना गती देण्यासाठी केला गेला, तरच आर्थिक ताळेबंदाला दीर्घकालीन स्थैर्य लाभेल, हाच या घडामोडींचा मुख्य धडा आहे.

# पावसाळ्यापूर्वी नाल्यांवरील अतिक्रमणे तातडीने हटवा

## शहर विद्रुपीकरणावर कठोर कारवाईचे आयुक्तांचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील नालेसफाईची कामे युद्धपातळीवर पूर्ण करून नाल्यांवरील अतिक्रमणे तातडीने हटवावीत, तसेच नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले. अनधिकृत जाहिरात फलक, पोस्टर आणि पत्रकांद्वारे शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्यांवर दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी प्रशासनाला दिले.



पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीला अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आयुक्तांनी शहरातील रस्ते दुभाजक, चौक आणि सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छता व सुशोभीकरणावर भर देण्याच्या सूचना दिल्या. प्रमुख रस्त्यांवरील दुभाजकांमध्ये सुशोभित झाडे लावून त्यांची नियमित छाटणी करावी, तसेच महत्त्वाचे चौक आकर्षक पद्धतीने विकसित करून स्वच्छता राखावी, असे त्यांनी सांगितले. शहर सुशोभीकरणासाठी इच्छुक संस्था आणि कंपन्यांचे सहकार्य घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

बसथांबे, भिंती, उद्याने, शाळा आणि सार्वजनिक इमारतींवर अनधिकृत पोस्टर, स्टिकर्स आणि जाहिरात फलक लावून शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. यामध्ये हलगर्जीपणा आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. पावसाळ्यात रस्ते आणि पुलांवर पाणी साचू नये यासाठी पाणी निचऱ्याच्या ठिकाणांवरील कचरा तातडीने हटविण्याच्या सूचना देण्यात आल्या. नाल्यांवरील अतिक्रमणांच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करून नैसर्गिक प्रवाह मोकळा ठेवण्यावर भर देण्यात आला. औद्योगिक क्षेत्रातील नालेसफाईसाठी उद्योजक, औद्योगिक विभाग आणि महापालिका यांच्यात समन्वय बैठका घेऊन उपाययोजना करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

याशिवाय शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची नियमित साफसफाई, मोडकळीस आलेल्या स्वच्छतागृहांची दुरुस्ती आणि महापालिकेच्या जलतरण तलावांवरील सुरक्षेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. जलतरण तलावांवर नियुक्त जीवरक्षक आणि कर्मचाऱ्यांनी विशेष दक्षता घ्यावी, असेही आयुक्तांनी सांगितले.

दरम्यान, महापालिकेच्या आरोग्य विभागाने ३१ मेपर्यंत शहरातील नालेसफाई पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. शहरातील १४१ नाल्यांपैकी ९४ हजार ९१३ मीटर लांबीच्या नाल्यांची ८५.८४ टक्के सफाई पूर्ण झाली असून उर्वरित काम वेगाने सुरू आहे. मेट्रो आणि रस्ते विकासाच्या कामांमुळे काही ठिकाणी अडथळे निर्माण होत असले तरी पर्यायी नियोजन करून नालेसफाई मोहीम सुरू ठेवण्यात आली आहे.

# मोशीत इंधन दरवाढीविरोधात युवक काँग्रेसचे आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पेट्रोल आणि डिझेलच्या दरात गेल्या अकरा दिवसांत चार वेळा वाढ झाल्याच्या निषेधार्थ मोशी येथे युवक काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आले. भोसरी-मोशी रस्त्यावरील पेट्रोल पंपावर सोमवारी हे आंदोलन पार पडले. वाढत्या इंधन दरांमुळे सर्वसामान्य आणि कष्टकरी नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

यावेळी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत निषेध नोंदविला. पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी आलेल्या नागरिकांना मेलडी चॉकलेट देत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. अनेक नागरिकांनी इंधन दरवाढीबाबत नाराजी व्यक्त केली. अच्छे दिनचे आश्वासन देणाऱ्या केंद्र सरकारबद्दल निराशा वाटत असल्याची भावना काही नागरिकांनी व्यक्त केली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर महागाईच्या मुद्द्यावर टीका केल्याचा उल्लेखही करण्यात आला.

या आंदोलनावेळी पिंपरी-चिंचवड शहर काँग्रेसचे अध्यक्ष नरेंद्र बनसोडे, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते गौरव चौधरी, प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव सत्यजीत बिरादार यांच्यासह युवक काँग्रेसचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# रक्षक चौकातील भुयारी मार्ग अंतिम टप्प्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** सांगवी फाटा ते किवळे मार्गावरील रक्षक चौक येथे उभारण्यात आलेल्या भुयारी मार्गाचे काम अंतिम टप्प्यात आले असून सध्या या परिसरातील वाहतूक पर्यायी मार्गाने सुरू असल्याची माहिती पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून देण्यात आली. या मार्गावरील सर्व सुरक्षा निकष पूर्ण करण्यात आल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

महापालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागाने दिलेल्या माहितीनुसार, प्रकल्पासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेमार्फत सुरक्षा तपासणी करण्यात आली आहे. तसेच वाहतूक मंत्रालय आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या मान्यताप्राप्त सुरक्षा लेखापरीक्षण संस्थेकडूनही प्रत्यक्ष पाहणी, सर्वेक्षण आणि सखोल अभ्यास करण्यात आला. त्यांच्या अहवालानुसार भुयारी मार्ग आणि त्यास जोडलेल्या रॅम्पच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

भुयारी मार्ग आणि दोन्ही बाजूंच्या उतार रस्त्यांवर वाहनांना ओव्हरटेक करण्यास बंदी घालण्यात आली असून इंडियन रोड काँग्रेसच्या मानकांनुसार ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादेचे फलक बसविण्यात आले आहेत. तसेच भुयारी मार्ग आणि रॅम्पवर संथ गतीची वाहने, सायकलस्वार आणि पादचारी यांना प्रवेशबंदी करण्यात आली असून त्यांच्यासाठी स्वतंत्र सेवा रस्त्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. हा मार्ग केवळ मोटार वाहनांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे.

बीआरटीएससाठी स्वतंत्र मार्गिका निश्चित करण्यात आली असून त्या मार्गिकेत ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादा लागू करण्यात आली आहे. उताराच्या रस्त्यांवर वेग नियंत्रणासाठी आडव्या पट्ट्यांचे चिन्हांकन करण्यात आले असून धोकादायक आणि मार्ग एकत्र येणाऱ्या ठिकाणी सौरऊर्जेवर चालणारे पिवळे दिवे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना वेग कमी करण्याचा इशारा मिळून अपघाताचा धोका कमी होण्यास मदत होणार असल्याचे महापालिकेने म्हटले आहे. रात्रीच्या वेळी दृश्यमानता वाढविण्यासाठी संरक्षक कठड्यांवर परावर्तित पट्ट्यांसह मध्यदर्शक बसविण्यात आले आहेत. संपूर्ण पुलावर वाहतूक नियंत्रण आणि वेगमर्यादेचे फलक लावण्यात आले आहेत.

मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी नागरिकांनी ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादेचे काटेकोर पालन करावे आणि वाहतुकीचे नियम पाळावेत, असे आवाहन केले आहे.

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी हा भुयारी मार्ग सुरू झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ होणार असल्याचे सांगितले. तसेच बीआरटीएस मार्गिकेत खासगी चारचाकी आणि दुचाकी वाहनांनी प्रवेश करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# काळेवाडीत स्पा सेंटरवर पोलिसांची धाड; एकाला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** काळेवाडी परिसरातील 'सुविधा स्पा' या स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या अनैतिक देहव्यापारावर पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून तीन महिलांची सुटका करण्यात आली आहे.

यांप्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २२३/२०२६ दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १४३(३) तसेच अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ अंतर्गत कलम ३, ४, ५ व ७ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ मे रोजी




रात्री सुमारे ९.५६ वाजण्याच्या सुमारास काळेवाडी येथील रहाटणी रोडवरील अंबिका कॉम्प्लेक्समधील 'सुविधा स्पा' येथे ही कारवाई करण्यात आली. आरोपी अजित गोरख घोळप (वय ३७, रा. हिंजवडी, पुणे) याने स्पा सेंटरच्या नावाखाली तीन महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यवसाय करून घेत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. तसेच या व्यवसायातून मिळणाऱ्या पैशांवर स्वतःची उपजीविका करत असल्याचेही समोर आले आहे.

विशेष म्हणजे संबंधित स्पा सेंटरच्या परिसरात रुग्णालय व क्लिनिकसारखी सार्वजनिक ठिकाणे असतानाही आरोपीकडून हा प्रकार सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत तीन महिलांची सुटका करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मेटे करत आहेत.

**खेडमध्ये गांजासह वृद्धाला अटक**

**खेड :** पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने अमली पदार्थ बाळगणाऱ्या एका वृद्धाला दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी अटक केली. ही कारवाई मंगळवारी सायंकाळी सद्गुरू मिसळजवळील मोकळ्या जागेत करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गहिनीनाथ लक्ष्मण जोशी (वय ६०, रा. सद्गुरू मिसळजवळ, ता. खेड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून ३७ हजार ५५० रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिस शिपाई महेश नामदेव गायकवाड यांनी दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक घुले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

**बांधकाम साईटवरून चोरी**

**पिंपरी :** देहूरोड परिसरातील बांधकाम साईटवरून वायरचे बंडल चोरी केल्याप्रकरणी एका कामगाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ४ मे ते ११ मे या कालावधीत आदर्श नगर, देहूरोड येथे घडली. याप्रकरणी समाधान राजाराम नवले (वय ३२, रा. मोशी, पुणे) यांनी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. माहितीनुसार, बांधकामासाठी लागणारे साहित्य ठेवण्यात आलेल्या रूममधून आरोपी दत्तात्रय अरुण पवार (वय ३८, रा. विकासनगर, देहूरोड) याने वायरचे बंडल चोरून नेले. चोरीस गेलेल्या साहित्याची किंमत सुमारे १ लाख ३ हजार ८०१ रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल आहे.

**कौटुंबिक वादातून मारहाण**

**खेड :** खेड तालुक्यातील वासोली परिसरात कौटुंबिक वादातून महिलेसह तिघांना मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना रविवारी (दि. २५) दुपारी घडली. याप्रकरणी तात्याराव बाबाराव तायडे (वय ४८) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार रवी धर्माजी सावळे (वय ३८) आणि अतुल धर्माजी सावळे (वय ३०, दोघे रा. वासोली, ता. खेड) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची मुलगी प्रिती सावळे हिची कागदपत्रे आणि आधार कार्ड घेण्यासाठी आरोपींच्या घरी गेले होते. त्यावेळी आरोपींनी फिर्यादी, प्रिती सावळे आणि चैत्राली तायडे यांना शिवीगाळ करून मारहाण केली.

# आयशरच्या धडकेत दोन तरुण ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** नाशिक-पुणे महामार्गावरील चिंबळी फाटा परिसरात भरधाव आयशर वाहनाने पल्सर दुचाकीला धडक दिल्याने दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. २५) मध्यरात्री घडली. या प्रकरणी दक्षिण एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रितेश वैकुंठराव भगत (वय २१, रा. साने चौक, चिखली) यांनी फिर्याद दिली आहे. नाशिक-पुणे महामार्गावरील चिंबळी फाटा येथे मोशीकडे जाणाऱ्या वळणाजवळ हा अपघात झाला. शिलकेश प्रल्हाद काळपांडे आणि त्यांचा मित्र रुपेश दिगंबर भरक्षे हे पल्सर दुचाकीवरून जात असताना आयशर चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगात वाहन चालवत अचानक ब्रेक मारून वाहन वळवले. त्यामुळे मागून येणारी पल्सर दुचाकी आयशरवर आदळली.

या भीषण अपघातात शिलकेश काळपांडे आणि रुपेश भरक्षे यांना डोके, हात, पाय व छातीला गंभीर दुखापत झाली. उपचारापूर्वीच दोघांचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीचेही मोठे नुकसान झाले आहे. आयशर चालकाविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक घुले करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### सुनील तांबे यांचे निधन



**रांजणगाव गणपती :** शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती तसेच गणेगाव खालसा (ता. शिरूर) येथील माजी सरपंच सुनील दत्तात्रय तांबे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, पुतणे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. ठाणे येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक प्रविणकुमार तांबे आणि उद्योजक प्रेमराज तांबे हे त्यांचे पुत्र होत.


### फरार आरोपीला अखेर जेरबंद

**बारामती :** बारामती शहर पोलिसांनी धाडसी आणि नियोजनबद्ध कारवाई करत तब्बल १५ गुन्ह्यांमध्ये न्यायालयाने नॉन-बेलेबल वॉरंट जारी केलेल्या सराईत फरार आरोपीला अटक केली. अनेक वर्षांपासून पोलिस आणि न्यायालयीन प्रक्रियेला चकवा देणारा शंकर उर्फ पोक्या प्रकाश आडके याला अखेर पोलिसांनी जेरबंद केले. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार २४ मे रोजी सकाळी बारामती शहर पोलिसांनी सापळा रचला होता. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने करा नदीच्या उंच भिंतीवरून थेट नदीत उडी घेत पळ काढण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तो नदीकाठच्या दाट उसाच्या फडात लपून बसला. मात्र, पोलिसांनी हार न मानता सुमारे दीड तास परिसरात कसून शोधमोहीम राबवली. उसामधील संशयास्पद हालचाली लक्षात आल्यानंतर पोलिसांनी संपूर्ण परिसराला घेराव घालत आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. अनेक वर्षांपासून फरार असलेला आरोपी अखेर कायद्याच्या कचाट्यात सापडल्याने परिसरात या कारवाईची चर्चा सुरू झाली आहे. न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. नागरिकांकडून बारामती शहर पोलिसांच्या कारवाईचे कौतुक केले जात आहे.

### १५ दिवसांत १५२३ एकर जमीन प्रशासनाच्या ताब्यात

# पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनाला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** बहुप्रतीक्षित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रियेला मोठी गती मिळाली असून अवघ्या १५ दिवसांत सात गावांतील १५२३ एकर जमीन प्रशासनाच्या ताब्यात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या आकर्षक पॅकेजनंतर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर संमतीपत्रे आणि प्रतिज्ञापत्रे जिल्हा प्रशासनाकडे जमा केली आहेत.

जिल्हा प्रशासनाने ७ मेपासून संमतीपत्रे स्वीकारण्यास सुरुवात केली होती. या प्रक्रियेत आतापर्यंत १५२३ एकर जमिनीसाठी सुमारे ४५० कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित गावांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जमीन संपादनासाठी प्रतिज्ञापत्रे आणि पूरक कागदपत्रे स्वीकारण्याची प्रक्रिया १० जूनपर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

उर्वरित शेतकऱ्यांना आणखी १५ दिवसांची मुदत देण्यात आली असून या कालावधीत संमती न देणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी पुढील टप्प्यात सक्तीने संपादित केल्या जाऊ शकतात. मात्र, अशा शेतकऱ्यांना सरकारकडून दिला जाणारा १० टक्के जमीन परताव्याचा लाभ मिळणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जितेंद्र डुडी यांनी सांगितले की, पुरंदर विमानतळासाठी सात गावांतील १५२३ एकर जमिनीची प्रतिज्ञापत्रे प्राप्त झाली असून त्यासाठी ४५० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. आणखी संमतीपत्रे मिळण्याची अपेक्षा असून त्यासाठी राज्य सरकारने अतिरिक्त निधीही उपलब्ध करून दिला आहे.

दरम्यान, पुरंदर विमानतळासाठी एकूण तीन हजार एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. त्यापैकी जवळपास ५० टक्के जमीन संपादन प्रक्रिया पूर्ण झाल्याचे मानले जात आहे. राज्य सरकारने पहिल्या टप्प्यात ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. आता आणखी संमतीपत्रे मिळण्याची शक्यता लक्षात घेऊन अतिरिक्त ५०० कोटी रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाला मंजूर करण्यात आला आहे.

## जनाई-शिरसाई योजनेतून आवर्तन देण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड :** जनाई-शिरसाई योजनेतून खोर येथील पद्मावती तलावासाठी नुकतेच पाणी सोडण्यात आले होते. मात्र, अवघ्या तीन दिवसांतच हे आवर्तन बंद करण्यात आल्याने अनेक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळू शकला नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः खोर ओढ्याच्या शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचले नसल्याने वाढीव उन्हाळी आवर्तन तातडीने सोडण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पद्मावती तलाव पूर्ण क्षमतेने भरला जाण्यापूर्वीच पाणीपुरवठा बंद करण्यात आला. त्यामुळे तलावात अपेक्षित पाणीसाठा निर्माण झाला नाही आणि अनेक शेतांपर्यंत पाणी पोहोचू शकले नाही. नियमानुसार शुल्क भरूनही शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांना पाणी न मिळाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. पाण्याचे नियोजन योग्य पद्धतीने झाले नसल्याचाही आरोप काही शेतकऱ्यांनी केला आहे.

सध्या खोर परिसरात अंजीर पिकाच्या खट्टा बहार हंगामाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. अंजीरबागांची छाटणी, चाळणी, बांधणी आणि इतर व्यवस्थापनाची कामे सुरू असून या काळात पाण्याची मोठी आवश्यकता असते. वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्यास आगामी हंगामात दर्जेदार आणि भरघोस उत्पादन मिळू शकते, असे शेतकऱ्यांनी सांगितले.

खोर परिसरातील अनेक शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था अंजीर पिकावर अवलंबून आहे. मात्र, उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे भूजलपातळी घटली असून विहिरी आणि कूपनलिकांतील पाणीही कमी झाले आहे. त्यामुळे जनाई-शिरसाई योजनेचे आवर्तन हा शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरत असतो. यंदा आवर्तन अपुरे राहिल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडली आहे.

## संस्थान कोणाणालाही पाठीशी घालणार नाही : अ‍ॅड. उमाप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** माऊली मंदिर येथील दानपेटीतील रकमेच्या अपहार प्रकरणात आळंदी संस्थानने कडक भूमिका घेतली असून या प्रकरणात कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका पालखी सोहळा प्रमुख अ‍ॅड. राजेंद्र उमाप यांनी मांडली. संबंधित प्रकरणात संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अन्य चार जणांना खुलासा करण्यासाठी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. माऊली मंदिरातील भक्त निवासात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक माऊली वीर यांच्यासह ग्रामस्थ पदाधिकारी उपस्थित होते.

अ‍ॅड. उमाप यांनी सांगितले की, नोटीस बजावण्यात आलेल्यांमध्ये व्यवस्थापक, उपव्यवस्थापक, लेखापाल आणि अन्नदान विभाग प्रमुख यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल. मंदिरातील कर्मचारी आणि सेवेकऱ्यांच्या कामकाजावर अधिक लक्ष ठेवण्यात येणार असून सुरक्षा व्यवस्था आणि कर्मचारी सेवेसंदर्भात कडक नियमावली लागू करण्यात आली आहे.

दानपेटी अपहार प्रकरणातील संशयित विशाल वारुळे हा देवस्थानचा अधिकृत कर्मचारी नसून तो विविध विभागांत मदतनीस म्हणून काम करत होता. अन्नदान विभाग तसेच पालखी सोहळ्यात आचारी म्हणून त्याने काम केले होते. त्याच्या कामकाजामुळे संबंधितांचा विश्वास संपादन झाल्याने कोणालाही संशय आला नव्हता. मात्र, सीसीटीव्ही फुटेज तपासताना त्याच्या हालचाली संशयास्पद आढळल्याने पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली, असे अ‍ॅड. उमाप यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणानंतर मंदिर परिसरातील सुरक्षा अधिक कडक करण्यात आली आहे. कर्मचारी, सेवेकरी आणि सुरक्षा रक्षकांसाठी ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले असून मंदिरात प्रवेश आणि बाहेर पडताना तपासणी केली जाणार आहे. तसेच मंदिर परिसरात पिशव्या किंवा संशयास्पद वस्तू आणण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

दानपेटीतील रकमेची मोजणी प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी आधुनिक सॉफ्टवेअर प्रणाली, अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा आणि एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असल्याची माहितीही अ‍ॅड. उमाप यांनी दिली. कर्मचारी आणि सेवेकऱ्यांची उपस्थिती डिजिटल ट्रॅकिंग प्रणालीद्वारे नोंदवली जाणार असून त्यासाठी नियोजन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

## मंचर बाजार समितीत कांदा लिलाव बंद

### कांदा दर घसरणीविरोधात आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** कांद्याच्या बाजारभावात झालेल्या मोठ्या घसरणीच्या निषेधार्थ मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा लिलाव बंद पाडत शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन छेडले. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. सरकारने तातडीने हस्तक्षेप करून कांद्याला हमीभाव द्यावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

कांद्याचे उत्पादन खर्च वाढले असताना बाजारात मिळणारे दर अत्यंत कमी असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली. मंचर बाजार समितीत सकाळपासूनच शेतकरी मोठ्या संख्येने जमा झाले होते. लिलाव प्रक्रियेदरम्यान व्यापाऱ्यांकडून अत्यल्प दर दिले जात असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडला. काही काळ बाजार समितीतील व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले होते.

आंदोलनकर्त्यांनी कांद्याला किमान २० रुपये प्रतिकिलो दर मिळावा, अशी मागणी केली. तसेच केंद्र सरकारने कांदा निर्यातीवरील निर्बंध आणि शुल्क धोरणाचा पुनर्विचार करावा, अशीही मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सध्याचे दर उत्पादन खर्चापेक्षाही कमी असून वाहतूक, मजुरी, साठवणूक आणि शेतीखर्च भागवणे कठीण झाले आहे.

मंचर बाजार समितीत दररोज मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक होत असते. मात्र, मागणीच्या तुलनेत पुरवठा वाढल्याने आणि निर्यात धोरणातील मर्यादांमुळे बाजारभाव कोसळल्याचे सांगितले जात आहे. कांद्याचे दर स्थिर ठेवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून सातत्याने केली जात आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील लासलगाव, येवला आणि इतर बाजार समित्यांमध्येही यापूर्वी कांदा दरघसरणीविरोधात आंदोलन आणि लिलाव बंद आंदोलन झाले होते. कांदा निर्यातीवरील शुल्क कमी करून बाजारातील मागणी वाढवावी, अशी मागणी शेतकरी संघटनांनी पुन्हा एकदा केली आहे.

## कांदा उत्पादकांच्या प्रश्नांवर निवेदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** जुन्नर तालुक्यासह राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या आर्थिक संकटाचा सामना करत असून कांद्याला मिळणाऱ्या अत्यल्प दरामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जुन्नर तहसील कार्यालयात विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

निवेदनामध्ये कांद्याला तात्काळ हमीभाव जाहीर करणे, शासन खरेदी सुरू करणे, कांदा निर्यातीवरील निर्बंध हटविणे, प्रति क्विंटल अनुदान देणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत आणि कर्जमाफी जाहीर करणे तसेच शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी धोरण राबविण्याच्या मागण्या करण्यात आल्या.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरेश भोर यांनी शेतकरी हा देशाचा कणा असून त्यालाच आपल्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याची खंत व्यक्त केली. शासनाने केवळ घोषणा न करता तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कांदा उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त होत असताना शिवसेना शांत बसणार नसून शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी तीव्र लढा उभारला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

तालुकाप्रमुख भास्कर गाडगे यांनी जुन्नर तालुक्यातील शेतकरी मोठ्या अडचणीत सापडल्याचे सांगितले. उत्पादन खर्च वाढला असताना बाजारात कांद्याला कवडीमोल दर मिळत असल्याने शेतकरी संकटात सापडल्याचे त्यांनी नमूद केले. शासनाने तातडीने दिलासा न दिल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी उपजिल्हाप्रमुख शरद चौधरी, आनंद रासकर, बन्सी चतुर, राहुल सुकाळे, उत्तम काशीद, खंडू शिंदे, शहरप्रमुख मयूर रोकडे, शैलेश बनकर, अमोल बनकर, बाळासाहेब सदाकाळ, साईनाथ डोके, प्रसाद बनकर, युवासेनेचे शांताराम सावंत, महिला जिल्हा संघटिका ज्योत्स्नाताई महाबरे, उत्तम आहेर, जयराम तांबे, जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे, पंचायत समिती उपसभापती अमित ढोले यांच्यासह शिवसैनिक आणि कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्तव्य बजावताना वायरमनचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील गिरवली येथे महावितरणमध्ये वायरमन म्हणून कार्यरत असलेले विक्रम भालेराव यांचा कर्तव्य बजावत असताना विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना सोमवारी सायंकाळी सहा ते सव्वासहा वाजण्याच्या सुमारास घडली असून परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गिरवली गावातील एका शेतकऱ्याच्या कृषी पंपाचे वीज कनेक्शन नादुरुस्त झाल्याची माहिती मिळाल्यानंतर विक्रम भालेराव दुरुस्तीच्या कामासाठी घटनास्थळी पोहोचले होते. स्मशानभूमीजवळील डीपीवरील फ्यूज काढल्यानंतर ते विजेच्या खांबावर चढून काम करत होते. याचदरम्यान अचानक विद्युतप्रवाह सुरू झाल्याने त्यांना जोरदार विजेचा धक्का बसला. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. गावात सुरू असलेल्या चर्चेनुसार, भालेराव खांबावर काम करत असताना कोणीतरी अनावधानाने फ्यूज पुन्हा बसवल्याने विद्युतप्रवाह सुरू झाला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत दुजोरा अद्याप मिळालेला नाही. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी विद्युत निरीक्षक कार्यालयामार्फत संपूर्ण घटनेची चौकशी करण्यात येणार असल्याचे सांगितले. अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असून त्यानुसार पुढील कारवाई केली जाणार आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. सहकारी कर्मचारी आणि ग्रामस्थांनी विक्रम भालेराव यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली.

## पवनचक्की कोसळून झाडावर पडली



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठार परिसरात झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे मोठे नुकसान झाले. पेठ ग्रामपंचायत हद्दीतील एक पवनचक्की वादळी वाऱ्यामुळे कोसळून भुईसपाट झाली. ही पवनचक्की जवळील मंदिराच्या संरक्षण भिंतीलगत असलेल्या झाडावर पडल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

पवनचक्की महावितरणच्या विद्युत तारांवर पडल्यामुळे गावातील वीजपुरवठा काही तास खंडित झाला. सुदैवाने ही घटना घडली त्यावेळी मंदिर परिसरात कोणीही उपस्थित नसल्याने मोठी दुर्घटना टळली. घटनेची माहिती मिळताच शनिवारी सकाळी स्थानिक ग्रामस्थ आणि महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पवनचक्की हटविण्याचे काम हाती घेतले होते. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे परिसरातील अनेक दुकानांचे फ्लेक्स, लोखंडी पाट्या तसेच रस्त्याकडील छोट्या-मोठ्या व्यावसायिकांचे जाहिरात फलकांचे नुकसान झाले. अनेक ठिकाणी फ्लेक्स उडून गेल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

### २ कोटी ३ लाख ३९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

# शिक्रापूरमध्ये अवैध मद्यवाहतुकीवर धडक कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती :** शिक्रापूर (ता. शिरूर) परिसरात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे विभागीय भरारी पथकाने मोठी कारवाई करत कर्नाटक, मध्यप्रदेश आणि गोवा राज्य निर्मित अवैध मद्य वाहतुकीचा पर्दाफाश केला. या कारवाईत १७१६ मद्याच्या बॉक्ससह दोन कंटेनर असा तब्बल २ कोटी ३ लाख ३९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख, अंमलबजावणी व दक्षता विभागाचे सहआयुक्त प्रसाद सुर्वे आणि विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली. उपअधीक्षक अनिरुद्ध पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाने शिक्रापूर परिसरात छापा टाकला. प्राथमिक कारवाईत कर्नाटक राज्य निर्मित आणि गोव्यात विक्रीस परवानगी असलेला मद्यसाठा जप्त करण्यात आला. तपासादरम्यान आरोपीने पांढऱ्या रंगाच्या अशोक लेलँड कंटेनरमधून मद्य वाहतूक होत असल्याची माहिती दिली. त्यानुसार पथकाने धुळे जिल्ह्यातील मुंबई-आग्रा महामार्गावरील लोडिंग टोलनाक्याजवळ संबंधित वाहन ताब्यात घेतले. वाहनाची तपासणी केली असता बडवायझर माईल्ड, किंगफिशर स्ट्राँग बिअर आणि गोवा व्हिस्कीचे एकूण ६९६ बॉक्स आढळून आले. या कारवाईत सुमारे ८१ लाख २७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वाहन चालकाविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आणखी एका कंटेनरवर बनावट क्रमांक प्लेट लावून कर्नाटकातून महाराष्ट्रात मद्य वाहतूक होत असल्याचे उघड झाले. त्यानुसार निरीक्षक नरेंद्र थोरात आणि दुय्यम निरीक्षक विराज माने यांच्या पथकाने सांगली जिल्ह्यातील महाराष्ट्र-कर्नाटक सीमेजवळ उमाडी-विजयपुरा मार्गावर सापळा रचला. तपासणीदरम्यान कंटेनरमध्ये किंगफिशर बिअर, व्हिस्की आणि व्होडकाचे १०१६ बॉक्स आढळून आले. कोणतीही वैध कागदपत्रे नसल्याने हा साठा जप्त करण्यात आला. या कारवाईत १ कोटी २१ लाख ९९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संपूर्ण कारवाईत दोन सहा चाकी कंटेनरसह एकूण १७१६ बॉक्स मद्य जप्त करण्यात आले असून पुढील तपास दुय्यम निरीक्षक निनाद निकम करत आहेत.

## प्रज्ञाताई कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ अनाथ मुलांना मदत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** येथील ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच स्वर्गीय प्रज्ञाताई प्रमोद कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ सामाजिक बांधिलकी जपत अनाथ मुलांसाठी मदतीचा उपक्रम राबविण्यात आला. स्वप्रवेध अनाथालय घराच्या वतीने मंगरुळ (पारगाव), ता. जुन्नर येथील अनाथ मुलांना आर्थिक मदत करण्यात आली.

या कार्यक्रमात पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांच्या हस्ते ११ हजार १११ रुपयांचा धनादेश संस्थापक तथा शिवव्याख्याते सचिन भोजणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. अनाथालयातील मुलांच्या शिक्षण आणि संगोपनासाठी ही मदत देण्यात आली.

यावेळी प्रमोद कुलकर्णी, अक्षय कुलकर्णी, ओंकार कुलकर्णी, रविंद्र भोजणे तसेच अनाथालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. स्व. प्रज्ञाताई कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

## सारांश वृत्त

### हत्तीच्या हल्ल्यात मुलाचा मृत्यू

**उधगमंडलम (तामिळनाडू):** निलगिरी जिल्ह्यातील गुडालूरजवळ एका जंगली हत्तीच्या हल्ल्यात एका १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी बुधवारी दिली. दुकानातून घरी परत येत असलेला मुलगा, जेव्हा एक जंगली हत्ती अचानक झुडपातून बाहेर आला आणि त्याच्यावर चालून आला, तेव्हा तो मुलगा हादरून गेला. त्याची मदतीची हाक ऐकून, मदतीसाठी धावून आलेल्या काही गावकऱ्यांनी त्याला वाचवले आणि पांडलूर येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

### बंगालला पाऊस आणि वादळामुळे दिलासा

**कोलकाता** : उष्ण आणि दमट हवामानामुळे त्रस्त असलेल्या राज्याच्या दक्षिण आणि पश्चिम भागाला दिलासा देण्यासाठी, गंगा खोऱ्यातील पश्चिम बंगालच्या विविध जिल्ह्यांमध्ये या आठवड्याच्या अखेरपर्यंत पाऊस आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मंगळवारी झारग्राम जिल्ह्यातील कलाइकुंडा येथे ४१.५ अंश सेल्सिअस तापमानाची राज्यातील सर्वाधिक दैनंदिन नोंद झाली, त्यापाठोपाठ मेदिनीपूर आणि झारग्राम या दोन्ही ठिकाणी ३९.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. उत्तर बंगालमध्ये अनेक ठिकाणी झालेल्या हलक्या ते मध्यम पावसामुळे कमाल तापमानात वाढ झाली नाही.

### ममता बॅनर्जींविरोधात एफआयआर दाखल

**कोलकाता** : वकिलाने केलेल्या तक्रारीच्या आधारे धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. वकील रिंकी चट्टोपाध्याय सिंग यांनी सिलीगुडी सायबर क्राईम पोलीस ठाण्यात ही तक्रार दाखल केली. त्यांनी असाही आरोप केला आहे की, पोलिसांनी सुरुवातीला गुन्हा नोंदवण्यास नकार दिला होता आणि वारंवार पाठपुरावा केल्यानंतरच एफआयआर स्वीकारण्यात आला.

## निवडणूक आयोगाच्या अधिकारावर शिक्कामोर्तब

# एसआयआर मोहिमेला ‘सर्वोच्च’ मान्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : बिहारसह विविध राज्यांमध्ये राबविण्यात आलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्तपासणी (एसआयआर) प्रक्रियेला सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी वैध ठरवत भारतीय निवडणूक आयोगाच्या अधिकाराला मान्यता दिली. निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया राबविताना लोकप्रतिनिधित्व कायदा किंवा कोणत्याही घटनात्मक तरतुदीचे उल्लंघन केलेले नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. एम. पांचोली यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. यापूर्वी २९ जानेवारी रोजी या प्रकरणातील सुनावणी पूर्ण करून निकाल राखून ठेवण्यात आला होता.

न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले की, मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका पार पाडण्यासाठी मतदार याद्यांची शुद्धता राखणे अत्यावश्यक आहे आणि त्यासाठी विशेष सखोल पुनर्तपासणीची प्रक्रिया आवश्यक ठरते. निवडणूक आयोगाला अशी प्रक्रिया राबविण्याचा अधिकार असून ती संविधान आणि कायद्याच्या चौकटीत आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. खंडपीठाने निरीक्षण नोंदविताना म्हटले की, एसआयआर प्रक्रियेमध्ये मतदारांची नावे वगळण्यापूर्वी दावे आणि आक्षेप मांडण्याची संधी, टप्प्याटप्प्याने पडताळणी आणि अन्य सुरक्षा उपायांचा समावेश आहे. त्यामुळे ही प्रक्रिया मनमानी नसून कायदेशीर आणि पारदर्शक आहे.

बिहार आणि इतर राज्यांमध्ये निवडणूक आयोगाने २४ जून २०२५ रोजी विशेष पुनर्तपासणी मोहीम सुरू केली होती. त्यानंतर या प्रक्रियेच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देत अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिकांमध्ये असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स, पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज यांच्यासह राजकीय कार्यकर्ते योगेंद्र यादव, तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा, राष्ट्रीय जनता दलाचे खासदार मनोज झा, काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल आणि खासदार सुप्रिया सुळे यांचा समावेश होता.

याचिकाकर्त्यांनी निवडणूक आयोगाचा २४ जून २०२५ चा आदेश रद्द करण्याची मागणी केली होती. या प्रक्रियेमुळे संविधानातील अनुच्छेद १४, १९, २१, ३२५ आणि ३२६ तसेच लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० आणि मतदार नोंदणी नियम १९६० चे उल्लंघन होत असल्याचा दावा याचिकांमध्ये करण्यात आला होता. आयोगाने आपली भूमिका मांडताना ही प्रक्रिया कायदेशीर, आवश्यक आणि पारदर्शक असल्याचे सांगितले. विविध राज्यांमध्ये मतदार याद्यांची अचूकता सुनिश्चित करण्यासाठीच ही मोहीम राबविण्यात आल्याचा दावा आयोगाने केला होता.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी २८ जुलै रोजी बिहारमधील एसआयआर प्रक्रियेनंतर १ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या मतदार यादीच्या मसुद्याला स्थगिती देण्यास नकार दिला होता.

# महागाईच्या मुद्द्यावरून खर्गेंची मोदींवर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आहे. सामान्य जनता उष्णता सहन करू शकते, मात्र भाजप पुरस्कृत महागाईमुळे लोक त्रस्त झाले असल्याचे खर्गे यांनी म्हटले.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टमध्ये खर्गे यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधताना, आम्ही उष्णता सहन करू शकतो, पण महागाईच्या आगीमुळे जनता घामाघूम होत आहे. मोदीजी, आपल्या सरकारच्या कथित लुटीबद्दल आपण कधीच का बोलत नाही, असा सवाल उपस्थित केला.

देशातील अनेक भागांमध्ये तापमानात वाढ होत असल्याने आणि उष्णतेची तीव्र लाट जाणवत असल्याने पंतप्रधान मोदी यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले होते. त्यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक आणि घराबाहेर काम करणाऱ्या व्यक्तींना अधिक काळजी घेण्याचा सल्ला दिला होता.

उष्णतेमुळे होणाऱ्या थकव्याची लक्षणे दुर्लक्षित करू नयेत, अन्यथा त्यातून उष्माघाताचा धोका निर्माण होऊ शकतो, असा इशाराही मोदी यांनी दिला. भारतातील विविध भागांमध्ये वाढते तापमान अनेक आव्हाने निर्माण करत असून नागरिकांनी शक्य तितकी खबरदारी घ्यावी, असे त्यांनी म्हटले होते.

पंतप्रधानांनी नागरिकांना पुरेसे पाणी पिण्याचा, बाहेर पडताना पाणी सोबत ठेवण्याचा तसेच इतरांनाही पाणी उपलब्ध करून देण्याचा सल्ला दिला. कठीण हवामानाच्या परिस्थितीत परस्परांना मदत करणे ही महत्त्वाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

# मुख्यमंत्री विजय पहिल्या दिल्ली दौऱ्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चेन्नई/नवी दिल्ली** : तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी पदभार स्वीकारल्यानंतरच्या पहिल्या अधिकृत दौऱ्यासाठी बुधवारी विशेष विमानाने नवी दिल्लीकडे प्रयाण केले. या दौऱ्यात ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन राज्याशी संबंधित विविध प्रलंबित विषयांवर चर्चा करणार आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, दुपारी साडेचार वाजता होणाऱ्या बैठकीत विजय तामिळनाडूच्या विविध मागण्यांचे निवेदन पंतप्रधानांकडे सादर करण्याची शक्यता आहे. यामध्ये कल्याणकारी आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी निधी, विकासकामांना मंजुरी, मेकेदातू प्रकल्पाचा मुद्दा तसेच पीएम श्री योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भातील विषयांचा समावेश असणार आहे.

या दौऱ्यात मुख्यमंत्री विजय केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचीही भेट घेण्याची शक्यता आहे. राज्यातील सुरू असलेल्या प्रकल्पांसाठी आर्थिक सहाय्य तसेच आंतरराज्यीय विषयांवर चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, मुख्यमंत्री विजय हे काँग्रेस नेत्या सोनिया गांधी तसेच लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचीही भेट घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मुख्यमंत्री विजय २८ मे रोजी चेन्नईला परतणार आहेत. तामिळगा वेट्री कळघम पक्षाचे संस्थापक असलेल्या विजय यांनी २३ एप्रिल रोजी झालेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत पक्षाला विजय मिळवून दिल्यानंतर १० मे रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती.

# संयुक्त राष्ट्रांत भारताचा पाकिस्तानवर प्रहार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारताने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत पाकिस्तानवर पुन्हा एकदा कठोर शब्दांत निशाणा साधत सीमापार दहशतवादाच्या मुद्द्यावरून त्याला फटकारले आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत ‘संयुक्त राष्ट्र सनदेच्या तत्त्वांचे पालन’ या विषयावरील खुल्या चर्चेदरम्यान भारताचे स्थायी राजदूत पर्वथनेनी हरीश यांनी पाकिस्तानचा समाचार घेतला.

आपल्या भाषणात हरीश म्हणाले की, “पाकिस्तानने हे समजून घेतले पाहिजे की सीमापार दहशतवादाला प्रोत्साहन देण्याचे गंभीर परिणाम होतात. स्थापनेपासून पाकिस्तानने सातत्याने दहशतवाद, अतिरेकी विचारसरणी, हिंसक कट्टरतावाद आणि भारतविरोधी प्रचाराला खतपाणी घातले आहे.”

त्यांनी असा आरोप केला की, पाकिस्तान दहशतवादी आणि दुष्ट शक्तींना आश्रय देणे तसेच त्यांचा वापर करणे सुरूच ठेवत आहे. “पाकिस्तान लष्कराच्या ‘भारताला हजार जखमा करून रक्तबंबाळ करणे’ या कुप्रसिद्ध धोरणातूनच त्यांची मानसिकता स्पष्ट होते,” असेही त्यांनी म्हटले. पाकिस्तानने भारताविरोधात अनेक युद्धे लादली, विनाकारण आक्रमकता दाखवली आणि दहशतवादाचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या सनदेनुसार शांततापूर्ण सहजीवन आणि सार्वभौमत्वाचा आदर करण्याबाबत पाकिस्तानचे दावे पोकळ असल्याची टीकाही त्यांनी केली.

हरीश यांनी स्पष्ट केले की, स्वतंत्र भारताला स्थापनेपासून पाकिस्तानकडून सीमापार दहशतवाद आणि आक्रमणाचा सामना करावा लागला आहे. भारतीय भूभागांवर बेकायदेशीर कब्जा करण्याचे प्रयत्नही पाकिस्तानने केले असल्याचा आरोप त्यांनी केला. “दहशतवादाविरुद्ध स्वतःचे संरक्षण करण्याचा भारताला पूर्ण अधिकार आहे,” असेही त्यांनी ठामपणे नमूद केले. जम्मू-काश्मीर मुद्द्यावरून भारताने पाकिस्तान आणि चीनलाही फटकारले आहे. बीजिंगमध्ये झालेल्या बैठकीनंतर चीन आणि पाकिस्तानने जारी केलेल्या संयुक्त निवेदनात काश्मीरचा उल्लेख करण्यात आला होता. त्यावर भारताने तीव्र आक्षेप घेतला.

परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकृत प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले की, “जम्मू-काश्मीर आणि लडाख हे भारताचे अविभाज्य आणि अहस्तांतरणीय भाग आहेत, होते आणि कायम राहतील. या विषयावर कोणत्याही तिसऱ्या देशाला भाष्य करण्याचा अधिकार नाही.”

# तृणमूल काँग्रेसमध्ये मोठ्या फुटीच्या चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात असताना, भारतीय जनता पक्षाचे खासदार सौमित्र खान यांनी तृणमूल काँग्रेसमध्ये मोठी फूट पडू शकते, असा दावा केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, तृणमूल काँग्रेसमधील अनेक आमदार आणि खासदार पक्ष नेतृत्वावर नाराज असून, सुमारे २० खासदार भाजपमध्ये प्रवेश करण्यास तयार आहेत.

माध्यमांशी बोलताना खान म्हणाले की, “तृणमूल काँग्रेसमधील जवळपास ५० आमदार पक्षाच्या कार्यपद्धतीवर नाराज आहेत. तसेच २० खासदार पक्ष सोडण्याच्या तयारीत आहेत. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने हिरवा कंदील दिल्यास हे नेते भाजपमध्ये सामील होऊ शकतात.”

त्यांनी दावा केला की, “हे घडले तर तृणमूल काँग्रेसचे अस्तित्व धोक्यात येईल. अनेक जण पक्ष सोडण्याच्या तयारीत आहेत.” मात्र, भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून किंवा तृणमूल काँग्रेसकडून यासंदर्भात अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये अलीकडेच १०० हून अधिक नगरसेवकांनी राजीनामे दिल्याच्या पार्श्वभूमीवर या चर्चांना अधिक वेग आला आहे. पक्षातील काही वरिष्ठ नेतेही नेतृत्वावर नाराज असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत.

तृणमूल काँग्रेसच्या नेत्या काकोली घोष दस्तिदार यांनी यापूर्वी आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली होती. तसेच फिरहाद हकीम यांच्याबाबतही पक्षांतर्गत नाराजीच्या चर्चा रंगल्या आहेत, जरी त्यांनी सार्वजनिकरीत्या कोणतेही भाष्य केलेले नाही.

## माजी मुख्यमंत्री विजयन यांच्या निवासस्थानाची झडती

# ईडीची केरळमध्ये छापेमारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तिरुवनंतपुरम** : सीएमआरएल मनी लॉंड्रिंग प्रकरणाच्या तपासासंदर्भात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) बुधवारी केरळचे माजी मुख्यमंत्री पिनारयी विजयन, त्यांचे जावई पी. ए. मोहम्मद रियास आणि इतर संबंधितांच्या निवासस्थानी छापेमारी केली. राज्यभरातील दहा ठिकाणी ही कारवाई करण्यात आली असून तिरुवनंतपुरममधील विजयन यांच्या भाड्याच्या निवासस्थानाचाही त्यामध्ये समावेश आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, कोझिकोडमधील मोहम्मद रियास यांच्या निवासस्थानीही ईडीने झडती घेतली. याशिवाय, कोचीन मिनरल्स अँड रुटाइल लिमिटेड कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या घरांवरही शोधमोहीम सुरू होती.

ईडीचा असा आरोप आहे की, विजयन यांच्या कन्या वीणा टी यांच्या मालकीच्या ‘एक्झालॉजिक’ या आयटी कंपनीला सीएमआरएलकडून आयटी सेवा पुरवल्याच्या नावाखाली सुमारे १.७२ कोटी रुपये देण्यात आले. मात्र, या सेवा प्रत्यक्षात पुरविण्यात आल्या नसल्याचा दावा ईडीने केला आहे. या रकमेचा वापर कंपनीची कर्जे फेडण्यासाठी करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणी ईडीने २०२४ मध्ये मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला होता. केरळ उच्च न्यायालयाने ईडीची कारवाई आणि समन्स रद्द करण्यास नकार दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

या छाप्यांनंतर सीपीआय(एम) ने भाजपप्रणीत केंद्र सरकारवर राजकीय सूडबुद्धीने कारवाई केल्याचा आरोप केला. पक्षाचे सरचिटणीस एम. ए. बेबी यांनी ही कारवाई प्रमुख विरोधी पक्षनेत्याला लक्ष्य करण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले. अशा दबावाला पक्ष आणि पिनारयी विजयन झुकणार नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. याचवेळी सीपीआय(एम)चे ज्येष्ठ नेते पी. जयराजन यांनी ही कारवाई भाजप आणि काँग्रेसच्या कथित संगनमताचा भाग असल्याचा आरोप केला. मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतर लगेचच ही कारवाई झाल्याने संशय अधिक बळावल्याचे त्यांनी म्हटले.

# कर्नाटकात नेतृत्वबदलाच्या चर्चांना उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बंगळूरू** : कर्नाटकात पुढील दोन दिवसांत नेतृत्वबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात असतानाच मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी २८ मे रोजी राज्यपाल थावरचंद गेहलोत यांच्या भेटीसाठी वेळ मागितल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयातील सूत्रांनी दिली आहे. या घडामोडींमुळे राज्याच्या राजकारणात मोठ्या हालचालींना वेग आला असून मुख्यमंत्री पदाबाबत नव्या चर्चांना उधाण आले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सिद्धरामय्या गुरुवारी राज्यपालांकडे राजीनामा सादर करू शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यासाठी मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा होऊ शकतो, अशी चर्चा आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षाचे नेते राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्यासोबत स्वतंत्र तसेच संयुक्त चर्चा केली आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या राज्यसभा निवडणुकांनंतर नेतृत्वबदलाबाबत अंतिम निर्णय घेतला जाऊ शकतो, असे सांगितले जात आहे. शिवकुमार समर्थकांकडून नेतृत्वबदलासाठी दबाव वाढत असल्याचेही सूत्रांनी म्हटले आहे. सिद्धरामय्या यांना केंद्रात भूमिका किंवा राज्यसभेची जागा देण्याचा प्रस्तावही चर्चेत आहे. मात्र, त्यांनी अद्याप कोणताही निर्णय स्वीकारलेला नसल्याचे सांगितले जात आहे.

## एअर इंडियाच्या देशांतर्गत उड्डाणांमध्ये कपात

**नवी दिल्ली** : इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे वाढणाऱ्या परिचालन खर्चाच्या पार्श्वभूमीवर एअर इंडिया आपल्या देशांतर्गत उड्डाणांमध्ये २२ टक्क्यांपर्यंत कपात करणार आहे, अशी माहिती आहे. आर्थिक अडचणींचा सामना करत असलेल्या आणि तोट्यात चाललेल्या एअरलाइनने आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुमारे २७ टक्क्यांनी कमी केली आहेत, असे सूत्रांनी सांगितले. कंपनी आठवड्याला ४,४०० उड्डाणे चालवते. त्यापैकी ३,६०० देशांतर्गत तर ८०० आंतरराष्ट्रीय सेवा असतात.

# एआयमुळे कामाची पद्धत बदलेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : गेल्या काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयने तंत्रज्ञानाच्या जगात मोठी क्रांती घडवून आणली आहे. विशेषतः चॅट-जीपीटी सारख्या एआय साधनांच्या आगमनानंतर भविष्यात यंत्रे माणसांच्या नोकऱ्या हिरावून घेतील का, हा प्रश्न जगभरात चर्चेचा विषय बनला. कंटेंट रायटिंग, कस्टमर सपोर्ट, डेटा एन्ट्री आणि बेसिक कोडिंगसारख्या क्षेत्रांतील रोजगार धोक्यात येतील, अशी भीती व्यक्त केली जात होती.

मात्र आता ओपनएआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी सॅम ऑल्टमन यांनी याबाबत महत्त्वपूर्ण विधान केले आहे. त्यांच्या मते, एआयमुळे काम करण्याची पद्धत बदलली असली तरी मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या अद्याप नाहीशा झालेल्या नाहीत.

सॅम ऑल्टमन यांनी स्पष्ट केले की, एआय लोकांची जागा घेण्याऐवजी त्यांचे काम अधिक सोपे, वेगवान आणि कार्यक्षम बनवत आहे. अनेक कंपन्या सध्या एआयचा वापर कर्मचाऱ्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी करत आहेत. त्यामुळे माणसांची पूर्णपणे जागा घेण्यापेक्षा एआय हे सहाय्यक साधन म्हणून अधिक प्रभावी ठरत असल्याचे दिसून येत आहे.

चॅट-जीपीटीचा वापर ईमेल लेखन, प्रेझेंटेशन तयार करणे, संशोधन, कंटेंट निर्मिती, कोडिंगमधील चुका शोधणे आणि माहिती संकलन अशा अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत आहे. तथापि, भविष्यात काही नोकऱ्यांचे स्वरूप बदलू शकते, हेही सॅम ऑल्टमन यांनी मान्य केले.

## आदिवासी समुदायांची माहितीपूर्ण संमती घेतली नाही

# ग्रेट निकोबार प्रकल्पावरून रमेश यांचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने ग्रेट निकोबार विकास प्रकल्पाला धोरणात्मक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा उपक्रम म्हणून जोरदार पाठिंबा दिल्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी या प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. त्यांनी आदिवासी व्यवहार मंत्री जुआल ओरम यांना पत्र लिहून वनहक्क कायदा २००६ (एफआरए) ची कठोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याची मागणी केली आहे.

रमेश यांनी आरोप केला की, ग्रेट निकोबार प्रकल्प मूळनिवासी शोम्पेन आणि निकोबारी समुदायांच्या पारंपरिक हक्कांकडे दुर्लक्ष करून पुढे नेला जात आहे. हा प्रकल्प वनहक्क कायदा आणि आदिवासी समुदायांच्या घटनात्मक संरक्षणांचे उल्लंघन करणारा असल्याचा दावा त्यांनी केला. आदिवासींचे हित सुरक्षित असल्याचा आणि कोणतेही विस्थापन होणार नसल्याचा प्रशासनाचा दावा वास्तवाशी विसंगत असल्याचे सांगत रमेश यांनी नमूद केले की, प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात संरक्षित वनक्षेत्र आणि आदिवासींच्या पारंपरिक जमिनी वळवण्यात येत आहेत.

त्यांनी पत्रात म्हटले आहे की, १८ नोव्हेंबर २०२० रोजी मंत्रालयाने या प्रकल्पासाठी ना हरकत प्रमाणपत्र देताना वनहक्क कायदा आणि पर्यावरण मंत्रालयाच्या ३ ऑगस्ट २००९ च्या आदेशाचे पालन करण्याची अट घातली होती. त्या आदेशानुसार आदिवासी समुदायांची माहितीपूर्ण संमती घेणे आवश्यक होते. मात्र, प्रत्यक्षात ही प्रक्रिया पूर्णपणे पाळली गेली नसल्याचा आरोप त्यांनी केला.

रमेश यांच्या मते, प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी सुमारे १३०.७५ चौ.कि.मी. वनक्षेत्र वळवले जाणार असून हे क्षेत्र शोम्पेन जमातीच्या पारंपरिक वास्तव्याचा भाग आहे. काही निकोबारी गावेही या प्रकल्पाच्या प्रभावक्षेत्रात येत असल्याचा दावा त्यांनी केला. प्रकल्प सल्लागार कंपनी एईकॉम यांनी प्रसिद्ध केलेल्या नकाशांमध्येही शोम्पेन जमातीची ठिकाणे दर्शवण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय, प्रशासनाने कथितपणे गैर-आदिवासी वसाहतदारांकडून संमती घेतल्याचा आरोप करत रमेश यांनी हितसंबंधांच्या संघर्षाचाही मुद्दा उपस्थित केला. आदिवासी कल्याणाशी संबंधित अधिकारीच प्रकल्पाच्या अंमलबजावणीत सहभागी असल्याने निष्पक्षतेवर प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले.

आदिवासी व्यवहार मंत्रालयाने स्वतंत्र पडताळणी न करता अंदमान-निकोबार प्रशासनाच्या दाव्यांवरच अवलंबून राहिल्याची टीकाही त्यांनी केली. तसेच कलकत्ता उच्च न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणात मंत्रालयाने स्वतःला प्रतिवादींच्या यादीतून वगळण्याची मागणी केल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, केंद्र सरकारने या प्रकल्पाचे समर्थन करताना सांगितले आहे की, ग्रेट निकोबार प्रकल्पामुळे भारताला पूर्व-पश्चिम सागरी मार्गावरील धोरणात्मक स्थानाचा फायदा होणार आहे. भारताचे परदेशी ट्रान्सशिपमेंट बंदरांवरील अवलंबित्व कमी करणे, संरक्षणविषयक क्षमता वाढवणे आणि राष्ट्रीय सुरक्षेला बळकटी देणे हा या प्रकल्पाचा उद्देश असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. सरकारच्या मते, बेटाच्या एकूण वनक्षेत्रापैकी केवळ १.८२ टक्के भाग या प्रकल्पासाठी वापरला जाणार असून त्याबदल्यात ९७.३० चौ.कि.मी. क्षेत्रात भरपाई स्वरूपात वनीकरण केले जाईल. तसेच शोम्पेन आणि निकोबारी समुदायांचे कोणतेही विस्थापन होणार नसल्याचा पुनरुच्चारही केंद्राने केला आहे.